# MARATHI (LL)

## SOLUTION : PRACTICE ACTIVITY SHEET 4

**प्र. 1. (अ)**

**(1)** (i) एक लीटर पेट्रोल जळते तेव्हा सुमारे अडीच किलो कार्बन डायऑक्साइड हवेत सोडला जातो.

(ii) स्नेहलने निश्चय केला की मी कॉलेजला जाताना सायकल वापरणार.

**(2)** (i) पावडेकाकांचा चेहरा पडला; कारण फूटप्रिन्टस ॲपवर त्यांची दोन काळीकुट्ट पाऊलचिन्हे उमटली.

(ii) रेखामावशींची पावलं अधिक सुंदर आहेत; कारण रेखामावशींच्या रोजच्या जगण्यात कार्बन उत्सर्जनाला वाव नाही.

**(3)** आपण जिथे राहतो, तिथून कोणत्या ना कोणत्या कामाच्या निमित्ताने बाहेर जातो. कधी पायी जातो, तर बहुतेक वेळा खाजगी वाहनाने जातो. त्या वेळी आपल्या पायांना भरपूर कार्बन चिकटलेला असतो. या कार्बनमुळे आपण आजूबाजूचे वातावरण प्रदूषित करीत असतो. म्हणजे आपण ग्लोबल वॉर्मिंगला मदतच करीत असतो. एखादे लहानसे काम करण्यासाठी थोड्याशा अंतरावरही आपण मोटारसायकलने जातो. हे करताना आपण प्रदूषण वाढवत असतो. लेखक म्हणतात की, आपल्या पायांचे वातावरणात उमटलेले ठसे लगेच पुसून टाकणे कठीण आहे. परंतु झाडे लावून त्याद्वारे आपली मळलेली पावले थोडी स्वच्छ करता येतील, याचे भान ठेवायला हवे.

**प्र. 1. (आ)**

**(1)** (i) बेफिकीर प्रवृत्तीचा

(ii) भले मोठे भगदाड

**(2)** (i) **स्वप्नाळू :** ही कोकणची गाडी किती छान दिसते! काय मजा येत असेल नाही गाडीतून जायला? आपणही मोठं झाल्यावर गाडीतून फिरू.

(ii) **संवेदनशील :** निरंजनने तो दगड उचलून बाजूला ठेवला. तुम्ही विसरलात; पण दुसरा ठेचकाळून जीवाला मुकतो त्याचं काय!

**(3)** निरंजन हा सद्गुणी मुलगा आहे. तो हुशार व मेहनती आहे. त्याची गुरुजनांवर खूप श्रद्धा आहे. वार लावून जेवणारा तो गरीब मुलगा आहे. त्याच्या तत्परतेमुळे व प्रसंगावधानामुळे फार भयंकर अपघात टळला. त्याने आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडले. तो खरा नागरिक आहे. अशा निरंजनशी मैत्री करायला कुणालाही आवडेल. दुसऱ्यावर प्रेम करणारा, सामाजिक जबाबदारी मानणारा, सदैव दुसऱ्याला मदत करणारा निरंजन नि:स्वार्थी स्वभावाचा आहे. मैत्री करायला आवश्यक असलेले सर्व गुण त्याच्यापाशी असल्यामुळे तो सर्वांना प्रिय होईल. तो माझा मित्र असल्याचा मला सार्थ अभिमानच वाटेल.

प्र. 1. (इ)

(1) **आई या भावभावनांचे उत्कट दर्शन आहे –**

- मांगल्य
- वात्सल्य
- प्रेम
- जिव्हाळा

*(**नोंद :** वरील उत्तरांच्या शब्दांमध्ये सात्त्विकता व ऋजुता हे दोन शब्दही योग्य.)*

(2) (i) उपनिषदकारांच्या मते आई म्हणजे,
परमेश्वर

(ii) संन्यस्त स्थितीत आईचे अंत्यदर्शन घेणारे
आदि शंकराचार्य

प्र. 2. (अ)

(1) (i) श्रावण

(ii) उत्क्रांतीचा

(iii) यंत्र

(iv) मोती

(2) **उत्क्रांतीचा ललकार घुमवणारे घटक**

- हातातील यंत्र
- उद्योगाचे चक्र

*(**नोंद :** वरील दोनपैकी एक 'श्रमशक्तीचे यंत्र' हेही उत्तर योग्य.)*

(3) (i) अधिकार– हक्क

(ii) चक्र – चाक

(iii) तेज – प्रकाश

(iv) विभव – वैभव/समृद्धी.

(4) कवी किशोर पाठक यांनी 'स्वप्न करू साकार' या कवितेमध्ये उद्याचा भारत सक्षम घडवण्यासाठी येणाऱ्या नवीन पिढीचे तेजोमय मूल्य कसे असेल, हे सांगताना ही ओळ लिहिली आहे. नव्या पिढीचे व नव्या युगाचे स्वप्न साकार करण्यासाठी नेमके काय करावे, हे सांगताना कवी म्हणतात, आपण सर्व अनेक धर्मपंथाचे असंख्य लोक असलो, तरी आपली एकजूट महत्त्वाची आहे. आपल्या मनगटातील ताकद एकच आहे. घराघरांतून जन्मलेले प्रत्येक बालक म्हणजे तेजाचा नवीन अवतार आहे. त्याच्या स्वागतासाठी एकजुटीच्या शक्तीची नौबत वाजते आहे.

राष्ट्रीय एकात्मता हे मूल्य व तेजोमय नवीन पिढी यांची सुयोग्य सांगड या ओळीत प्रकर्षाने जाणवते.

**प्र. 2. (आ) कविता –** रंग मजेचे रंग उद्याचे

(1) **प्रस्तुत कवितेच्या कवयित्री** ⟶ अंजली कुलकर्णी.

(2) **प्रस्तुत कवितेचा विषय** ⟶ 'रंग मजेचे रंग उद्याचे' या कवितेतून कवयित्रींनी संगणक युगातही निसर्गाची दौलत जोपासायला हवी, हे सुंदर शब्दांत सांगितले आहे.

(3) **प्रस्तुत कवितेतील ओळींचा सरळ अर्थ** ⟶ अवतीभवती सृष्टीमध्ये फुललेल्या हिरव्या रंगाच्या विविध छटा पाहून आपली सर्वांची मनेही हिरवीगार प्रसन्न व्हावीत. रेशमी मखमली गाभ्यासारखा निर्मळ आनंद प्रत्येकाच्या मनात सळसळेल आणि या समृद्धीच्या कहाण्या आपण अभिमानाने सर्व जगाला सांगूया.

(4) **प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश** ⟶ 'रंग मजेचे रंग उद्याचे' या कवितेमध्ये कवयित्री अंजली कुलकर्णी यांनी यंत्रयुगातही पर्यावरण सुंदर ठेवावे, म्हणजे मानवी मनेही समृद्ध होतात हा संदेश दिला आहे. मानवाने पर्यावरणाची काळजी घेतली पाहिजे. निसर्गाशी रममाण होऊन जगण्यातच खरा आनंद आहे, हा मौलिक संदेश ही कविता देते.

(5) **कवितेतील शब्दांचे अर्थ** – (i) फूल – सुमन (ii) मन – चित्त

(iii) गोष्ट – कथा (iv) धवल – पांढरेशुभ्र

**किंवा**

**कविता –** योगी सर्वकाळ सुखदाता

(1) **प्रस्तुत कवितेचे कवी** ⟶ संत एकनाथ महाराज.

(2) **प्रस्तुत कवितेचा विषय** ⟶ संत एकनाथ महाराजांच्या या ओव्या योगी पुरुषाचे महत्त्व सांगणाऱ्या आहेत.

(3) **प्रस्तुत कवितेतील ओळींचा सरळ अर्थ** ⟶ आकाशातील ढगांतून पाणी खाली मातीवर येते, त्यामुळे त्यातून अन्नधान्य निर्माण होते. त्याप्रमाणे योगी पुरुष जेव्हा धरतीवर अवतरतो म्हणजेच जेव्हा तो इहलोकात जन्म घेतो; तेव्हा त्याच्या बोलण्याने, ते बोल ऐकण्याने लोकांची मने तृप्त होतात. योगी पुरुष आत्मज्ञानाने लोकांचा उद्धार करतो.

(4) **प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश** ⟶ योगी पुरुष तप:साधनेने आत्मज्ञान प्राप्त करतो. त्या आत्मज्ञानाची शिदोरी तो जनमानसात श्रवणकीर्तनाने वाटतो. योगी पुरुषाच्या आत्मज्ञानाने माणसांची मने नि:स्वार्थी व निर्मळ होतात. म्हणूनच योगी पुरुषाच्या संगतीने संसारातील दु:खे निवारण करण्याचे आत्मिक बळ आणि मन:शांती मिळते, असा संदेश या अभंगातून मिळतो.

(5) **कवितेतील शब्दांचे अर्थ** – (i) निर्मळ – स्वच्छ (ii) जन – लोक

(iii) पांखोवा – पंख (iv) तृप्ती – समाधान

**प्र. 3.**

**(1)** दिवाळीत रंगीत कागदी कंदिलांची शोभा मला खूप आवडते. आई नेहमी बाजारातून छोटे कंदील विकत आणायची. या वर्षी मी ठरवले की, आपण स्वत: कागदी कंदील तयार करायचा. बघूया जमते की नाही ते? मी स्वत: स्टेशनरीच्या दुकानातून रंगीत जिलेटीन, कागद व काड्या आणल्या. सुताचे बंडल आणले नि दिवाळीच्या आदल्या सकाळी कंदील करायला घेतला. चौकोनात काड्या जोडायला घेतल्या; पण काही मनासारखे जमेना. मी पुन्हा विस्कटायचो, पुन्हा जोडायचो. नीट जमत नव्हते. दुपार झाली पण निश्चय केला की, कंदील पूर्ण झाल्याशिवाय जेवायचे नाही. हळूहळू मला ते जमायला लागले. पूर्ण कंदिलाचा काड्यांचा सांगाडा तयार झाला. मग त्यावर ताणून वेगवेगळे रंगीत कागद चिकटवणे सोपे गेले. अखेर खूप मेहनतीनंतर सुंदर कंदील तयार झाला. तेव्हा मला कळले की, 'प्रत्यक्ष अनुभवांतून शिकणे हे अधिक परिणामकारक असते.'

**(2)** सूर्य उगवतो तेव्हा मानवी जग चैतन्याने रसरसते. मानवाचे जीवन फुलते. मनात कार्य करण्याची इच्छा जागृत होते. दिवसभर सूर्यप्रकाशात मानवी मन उजळत राहते. परंतु सूर्यास्त होताच मानवी मन कृतार्थतेने भरून येते. घरी परतण्याची व कुटुंबात रमण्याची ओढ निर्माण होते. पण त्याचबरोबर दिवस मावळतोय, याची उदासी मनात रेंगाळत राहते. मन काहीसे हळवे होते. प्रियजनांच्या भेटीची हुरहूर मनात दाटून येते. सूर्यास्ताच्या वेळचा तेजोगोल मानवी जगाचा निरोप घेतो नि माणूसही सूर्याला निरोप देतो. परंतु पुन्हा उद्या सूर्यदर्शन होणार ही आशा मानवी मनात उमटत राहते.

**(3)** वाळवंटी प्रदेशाला 'मरुभूमी' म्हणजे जीवन संपवणारी भूमी म्हणतात. परंतु कधी काळी पाऊस आलाच तर वनस्पती त्याचा वापर कसा करतात हे पाहण्यासारखे आहे. पाऊस आला की उगवायचे आणि पाऊस संपला की बियांच्या रूपाने मातीत पडून राहायचे, हा इथल्या वनस्पतीचा नियम आहे. अवर्षणाचा प्रतिकार करणाऱ्या वनस्पतींमध्ये सर्वांत महत्त्वाचा प्रकार हा कॅक्टस आहे. कॅक्टस या वनस्पती पाऊस पडतो तेव्हा जेवढे पाणी मिळवता येईल तेवढे स्वत:मध्ये साठवून ठेवतात आणि कोरड्या हंगामात मंद गतीने वाढत राहतात. म्हणून 'थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना म्हणजे कॅक्टस!' असे म्हटले जाते.

**प्र. 4. (अ)**

**(1)** (i) प्रश्नार्थी वाक्य

(ii) आज्ञार्थी वाक्य

**(2)** (i) नकारार्थी वाक्य – माझे घर जवळ नाही.

(ii) विधानार्थी वाक्य – मुलांनो, नेहमी शिस्तीने वागावे.

**(3)** (i) थक्क होणे **– अर्थ :** चकित होणे.

**वाक्य :** तीन वर्षांच्या राहूलला सफाईने हार्मोनियम वाजवताना पाहून सर्व <u>थक्क झाले.</u>

(ii) कानावर येणे **– अर्थ :** बातमी समजणे.

**वाक्य :** सदाशिवरावांना पोलिसांनी पकडल्याचे आमच्या <u>कानावर आले.</u>

(iii) झोकून देणे **– अर्थ :** (कार्यात) समरस होणे.

**वाक्य :** छायाने क्लासच्या अभ्यासात स्वत:ला <u>झोकून दिले.</u>

**प्र. 4. (आ)**

**(1)** **(i)** (1) शर्करा = साखर

(2) जिव्हा = जीभ

**(ii)** (1) सुदैव × दुर्दैव

(2) दाट × विरळ

**(iii)** दुसऱ्यावर अवलंबून असलेला – परावलंबी

**(iv)** (1) बी – बिया

(2) पावले – पाऊल

**(2)** (1) आपण <u>लिहिलेला</u> <u>मजकूर</u> वाचणाऱ्याला लगेच समजायला हवा.

(2) <u>उत्तम</u> <u>नागरिक</u> कुणाला म्हणावे?

**(3)** (1) आजपासून मी बसनंच ये-जा करणार.

(2) अरेच्च्या! तू केव्हा आलास?

**प्र. 5. (अ), (आ) व (इ) ...**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी ही उत्तरे स्वत: लिहावीत.

या विषयातील सोडवून दिलेल्या पहिल्या कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखनामधील कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत; गुणदान-पद्धतीतील मुद्दे विचारात घ्यावेत आणि स्वत: लिहिलेले उत्तर स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

***उपयोजित लेखनाच्या अधिक अभ्यासासाठी***

***'नवनीत मराठी (LL) उपयोजित लेखन : इयत्ता दहावी'***

***या पुस्तकात दिलेले उपयोजित लेखनाचे नमुने अवश्य वाचावेत.***